MHAU060014602021

## नियमित दिवाणी दावा क्र.१९३/२०२१ मधील नि.क्र. १५ खालील आदेश

प्रतिवादी यांनी लेखी कैफियत दाखल करण्यासाठी झालेला ६ महिने २१ दिवसांचा विलंब माफ होवुन लेखी कैफियत स्वीकृत होणबाबत दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे कथन की, सदरील प्रकरणात प्रतिवादीला न्यायालयाची प्रत्यक्ष समन्स बजावणी झाल्याने प्रतिवादी हा मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दिनांक १८.१२.२०२१ रोजी सदर प्रकरणात नियुक्त विधिज्ञा मार्फत हजर झालेली आहे. सदरील प्रकरणातील प्रतिवादी हा हजर झाल्या पासुन ९० दिवसाचे आत प्रकरणात लेखी खुलास कैफियत दाखल करणे आवश्यक होते. तथापी प्रतिवादी हा सदर प्रकरणाची जुनी मुळ पुर्वापारची कागदपत्रे माहिती नसल्याने अभिलेख हे शासकीय व अभिलेख कार्यालयातुन जुनी असल्या कारणाने वेळेत काढु शकला नाही. त्यामुळे प्रतिवादी हा मुदतीत खुलासा कैफियत व म्हणने दाखल करु शकला नाही. परिणामी मा. न्यायालयाने सदरील प्रतिवादी विरुध्द दिनांक १७.०३.२०२२ रोजी विना लेखी खुलासा कैफियत शिवाय दावा चालविण्याचा आदेश पारित केला. प्रतिवादीने सदरच्या दाव्यात लेखी खुलासा कैफियत दाखल करणेस हेतुपुरस्करपणे कुचराई केली नसुन वादी व प्रतिवादी हे वेगवेगळे कुटूंबातील व दावा मिळकतीची जुनी मुळ कागदपत्र व आवश्यक ती माहिती आणि पुरक कागदपत्रांची जुळवाजुळव वेळेत मिळाली नसल्याने करु शकला नाही त्या अभावी मुदतीत कैफियत दाखल करु शकले नाही.

२. सदर अर्जास वादी यांनी मागील बाजुस म्हणणे दाखल करुन हरकत घेतली की, प्रतिवादीने प्रस्तुत प्रकरणात मुदतीत जबाब दाखल केला नाही त्यानंतर दिनांक १७.०३.२०२२ रोजी लेखी जबाब नाहीचा आदेश पारित केला आहे. प्रतिवादीने अर्जात कथन केलेले कारण संयुक्तीक कारण वाटत नसुन प्रकरण लांबविण्याच्या दृष्ट हेतुने वेळेत लेखी जबाब दाखल केलेला नाही. त्याकरिता प्रतिवादी अर्ज खर्चासहित नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. युक्तीवाद ऐकला.

४. वादीने सदर दावा अतिक्रमण काढुन ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे कथन की,प्रतिवादी हा सदर प्रकरणाची जुनी मुळ पुर्वापारची कागदपत्रे माहिती नसल्याने अभिलेख हे शासकीय व अभिलेख कार्यालयातुन जुनी असल्या कारणाने वेळेत काढु शकला नाही. त्यामुळे दि.१७.०३.२०२२ रोजी त्यांच्या विरुध्द विना कैफियत आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादीस सदर दाव्याचे समन्स दि.१३.१२.२०२१ रोजी बजावणी करण्यात आले होते व त्यानंतर प्रतिवादी दि. १८.१२.२०२१ रोजी वकीलांमार्फत हजर झाले होते परंतु त्यांनी विहीत मुदतीत कैफियत दाखल न केल्यामुळे त्यांच्या विरुध्द दि.१७.०३.२०२२ रोजी विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर प्रतिवादीने सदर आदेश दिनांक ०६.१०.२०२२ रोजी दाखल केलेला आहे.

५. तरी एकंदरीत दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे

आवश्यक व गरजेचे आहे. तरी सदर कारणाचा व नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रतिवादी यांचे लेखी कैफियत अभिलेखावर घेणे आवश्यक व गरजेचे आहे व त्यामुळे दाव्याच्या गुणदोषावर निर्णय होण्यास मदतच होणार आहे. करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रतिवादी नि.क्र. १५ चा अर्ज वादीस रक्कम रु.५००/-(अक्षरी रुपये पाचशे मात्र) खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by PRAMOD MANIK KOLSE
Date: 2022.12.01 11:33:12 +0530

**(पी.एम.कोळसे)**

दिनांक– २४.११.२०२२

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर (न्यायालय क्रं.१)
कन्नड

**प्रमाणपत्र**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ.निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | यो. सु. माळी. |
| न्यायालयाचे नांव | – | श्री. प्रमोद मा. कोळसे.<br>दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),<br>तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | – | २४.११.२०२२ |
| न्यायिक अधिका–यांनी<br>निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | – | २४.११.२०२२ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | – | ०१.१२.२०२२ |

..............................................................